नि. दि.दा. क्र. ७/२०११

काबाजी/किसन

निशाणी – १२३ खाली

**<u>शपथेवर उलटतपास वादींतर्फे श्री. के. बी. शिंदे वकील यांचेमार्फत</u>**

२. माझे शिक्षण तीसऱ्या वर्गापर्यंत झाले आहे. मला लिहीता वाचता येते. माझी जन्म तारीख दिनांक १२/०६/१९४४ आहे. मला मोडी लिपी वाचता व लिहीता येत नाही. मी धरुन आम्ही चार भावंड आहोत. माझ्या आजोबांना दोन मुल होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये नमूद असलेला दस्त मी वाचला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या दस्ताच्या वेळी माझा जन्म झाला नव्हता. सदरचा दस्त मी फलटण येथील दुय्यम निबंधक कार्यालय येथे दाखविला नव्हता. हे मला आठवत नाही की, सदर दस्तावर मोडीलिपीचे हस्ताक्षर कोणाचे आहे हे पडताळण्याकरीता मी दुय्यम निबंधक कार्यालय येथे गेलो होतो किंवा कसे.

३. सदर दस्तावर साक्षीदार कोण आहेत हे मला माहीती नाही. सदर दस्तावरील साक्षीदार कुठे राहतात याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे मला आठवत नाही की, मी सदर दस्तावरील साक्षीदारांच्या सह्यांची खात्री केली होती किंवा कसे. सदर दस्तावर किती रुपयांचा स्टॅम्प होता हे मला माहीती नाही. स्टॅम्प कोणाच्या नावे विकत घेण्यात आला होता हे सुध्दा मला माहीती नाही. सदर दस्त कोणाच्या हस्ताक्षरांमध्ये आहे हे मला सांगता येणार नाही. सदर दस्तावर अंगठ्याला दस्तुर कोणी बांधला हे सुध्दा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तावर कोणाचे अंगठे आहेत हे सुध्दा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तामध्ये काय नमूद केले आहे हे मला सांगता येणार नाही.

४. मी सातारा येथे गेलो होतो. मी सोनगाव, ता. जावली येथे गेलो नव्हतो. साताऱ्याला माझ्यासोबत प्रतिवादी क्र.३ मानसिंग हे होते. मानसिंगने मला सांगितले होते की,

फेरफारमध्ये तुमचे नाव निघाले. त्यांनी मला तुमच्या जवळ कागद आहे काय ते बघा असे म्हटले होते. मला असे म्हणायचे नाही की, मोडी लिपीमधुन मराठीमध्ये दस्ताचे भाषांत्तर मानसिंगने करुन घेतले होते. भाषांत्तराची तारीख मला सांगता येणार नाही. भाषांत्तराकरीता आम्ही पैसे दिले नव्हते. भाषांत्तर करणाऱ्या व्यक्तीचे नाव मला आठवत नाही.

५. ज्या व्यक्तीने भाषांत्तर केले त्याला मोडी लिपी वाचता येते किंवा कसे हे जाणुन घेण्याकरीता आम्ही त्याच्याकडे प्रमाणपत्र मागितले होते. त्या प्रमाणपत्राची तारीख मला आठवत नाही. ते प्रमाणपत्र मी पाहीले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्या व्यक्तीला मोडी लिपी वाचता येते या बाबतचे प्रमाणपत्र आम्ही ताब्यात घेतले नव्हते. सदरचे प्रमाणपत्र मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्या व्यक्तीने भाषांत्तराकरीता मला परत बोलविले नव्हते. भाषांत्तर टंकलिखीत करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, भाषांत्तर टंकलिखीत माझ्या समक्ष करण्यात आले नव्हते. साताऱ्यामध्ये कुठल्या ठिकाणी टंकलिखीत करण्यात आले होते हे मला सांगता येणार नाही.

६. भाषांत्तर केलेला कागद मी वाचला होता. भाषांत्तर केलेल्या कागदावर मुळ दस्त लिहीणाऱ्या दस्त लेखणीकाचे नाव नमूद आहे किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, भाषांत्तर केलेल्या दस्तामध्ये काय चतुःसीमा नमूद आहेत हे मला सांगता येणार नाहीत. दस्त लिहुण देणाऱ्याची ओळख कोणी घातली होती याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दस्त कुठल्या कार्यालयात नोंदविण्यात आला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दस्तामधील मोबदल्याचा तपशिल मला माहीती नाही.

७. दस्तामध्ये नमूद असलेली मालमत्ता कुठल्या फेरफारने अधिकार अभिलेखामध्ये नोंदविण्यात आली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या

मालमत्तेचा गट क्रमांक काय पडला हे मला सांगता येणार नाही. हे मला आठवत नाही की, मी गट एकत्रीकरणाबाबतचे कागदपत्र पाहीले होते किंवा कसे. माझ्या आजोबांच्या गट एकत्रीकरणातील खाते क्रमांक मला सांगता येणार नाही. माझ्या आजोबांच्या खात्यावर किती गट क्रमांक होते हे मला आज आठवत नाही. त्यांचे खाते किती एकराचे होते हे सुध्दा मला आठवत नाही. सदर मिळकतीचा गट क्रमांक किती पडला हे मला सांगता येणार नाही.

८. दस्त किती तारखेला नोंदविण्यात आला होता हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्त किती तारखेला लिहीण्यात आला होता हे मला सांगता येणार नाही. सातार्‍याच्या कुठल्या व्यक्तीने दस्ताचे भाषांत्तर केले होते हे मला आठवत नाही. मी यापुर्वी कुठल्याही न्यायालयामध्ये कधीही साक्ष दिलेली नाही. मला माझ्या पुराव्यातील शपथपत्रामधील मजकुर माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण
दिनांक ०५/०८/२०२४

(आर. डी. भुयारकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, फलटण